**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार  दिनांक १९  मार्च २०२६**

**ठळक बातम्या**

**1. गुढीपाडव्याच्या सणाचा सर्वत्र उत्साह, वैविध्यपूर्ण कार्यक्रमांची रेलचेल**

**2. राज्यातल्या नागरिकांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा संकल्प**

**3. वैचारिक अधिष्ठानामुळेच या तरुण भारत दैनिकाने गाठला शंभर वर्षांचा टप्पा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन**

**4. विदर्भाच्या बहुतांश जिल्ह्यांमध्ये आज वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट**

---

**गुढीपाडवा**

चैत्र शुद्ध प्रतिपदा अर्थात गुढीपाडव्याचा सण आज साजरा होत आहे. हिंदू कालगणनेनुसार शक संवत १९४८ या नव्या वर्षाला आजपासून प्रारंभ झाला. मराठी नववर्षाचं उत्साहात स्वागत करण्यासाठी आज राज्यात अनेक ठिकाणी विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. घरोघरी गुढ्या उभारून, रांगोळ्या काढून, दारांना मंगलतोरण आणि कडूलिंबाचे डहाळे बांधून तसंच इष्टदेवतांच्या दर्शनाने हा दिवस साजरा केला जातो. आजचा दिवस साडे तीन शुभ मुहूर्तांपैकी एक असल्याने घर, वाहन तसंच सोन्याचांदीच्या आभुषणांसह इतर महत्त्वाच्या खरेदीचा प्रघात आहे. देशाच्या विविध भागात चैत्र शुक्लादि, उगादी, चेती चंद, नवरेह आणि साजिबू चेरोबा, हे सण देखील आज साजरे होत आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासियांना या सणाच्या शुभेच्छा दिल्या आहे. हे सण म्हणजे भारताच्या समृद्ध सांस्कृतिक विविधतेचं प्रतिक असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, राज्यपाल जिष्णु देव वर्मा, तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जनतेला गुढीपाडव्याच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हा सण नवीन वर्षाच्या आगमनाचं प्रतिक असून, नवचैतन्य, आशा आणि नव्या संधींचा संदेश घेऊन येतो, असं पंतप्रधानांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. चैत्र नवरात्रीच्या देखील मोदी यांनी शुभेच्छा दिल्या. यानिमित्त त्यांनी शक्तिची देवता दुर्गेकडे विकसित राष्ट्राच्या संकल्पाला

नवीन ऊर्जा प्रदान करण्याचं आवाहन केलं.हे नववर्ष आपल्या सर्वांसाठी सुख, समाधान आणि समृद्धी घेऊन येवो. सर्वांना निरामय आरोग्य लाभो आणि यातून लाभणाऱ्या नवचैतन्यातून महाराष्ट्रधर्म वाढविण्याचा, मराठीची गुढी आणखी उंच उभी करण्याचा निर्धार करुया, असं मुख्यमंत्र्यांनी आपल्या संदेशात म्हंटलं आहे.दरम्यान, फडणवीस आज नागपूर इथं गुढीपाडवा आणि मराठी नववर्षानिमित्त आयोजित 'भव्य शोभायात्रा आणि रामरक्षा पठण' कार्यक्रमात सहभागी झाले होते.

---------------------------------------------------------

**गुढी पाडवा**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूरकरांसोबत गुढीपाडव्याच्या निमित्ताने नववर्षाचे उत्साहात स्वागत केले. नागपुरातील तात्या टोपे नगर ते लक्ष्मी नगर चौक दरम्यान श्री सिद्धिविनायक सेवा ट्रस्ट यांच्या वतीने भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते.या शोभायात्रेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सहभाग घेत रामरक्षा पठण केले आणि उपस्थित नागरिकांना नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या. भारत मातेची सजीव झांकी आणि विविध चित्ररथांनी उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले.यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाची प्रगती अशीच उंचावत राहो, अशी भावना मुख्यमंत्री यांनी व्यक्त केली.देश आधुनिकतेकडे वाटचाल करत असताना तरुणाई परंपरा जपत असल्याचा आनंद त्यांनी व्यक्त केला. राज्याला पुढे नेण्याचा आणि राज्यातल्या प्रत्येक नागरिकाच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्याचा संकल्प नवीन वर्षप्रारंभानिमित्त केल्याचं फडणवीस यांनी यावेळी सांगितलं...

***(होल्ड- बाईट- फडणवीस)***

अकोल्याच्या संस्कृती संवर्धन समितीच्या वतीने नववर्षाच्या स्वागतासाठी आज मोटारसायकल रॅली काढण्यात आली. पारंपारिक मराठमोळ्या वेशभूषेत सजलेले नागरिक मोठ्या उत्साहात यात सहभागी झाले होते. अकोल्याचं आराध्य दैवत श्री राज राजेश्वर महाराज मंदिरापासून या रॅलीची सुरुवात झाली.बुलढाणा जिल्ह्यात खामगाव शहरात मिशन ओ टू च्या वतीने महिलांनी वृक्षारोपणाची गुढी उभारून गुढीपाडवा उत्सव साजरा केला. यावेळी उपस्थित महिलांना वृक्षारोपणाची शपथ देण्यात आली.

---------------------------------------------------------

**श्रीराम यंत्र**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज अयोध्येतल्या राम मंदिरात विशेष धार्मिक विधीचा भाग म्हणून दीडशे किलो वजनाचं सोन्याचा थर चढवलेलं 'श्रीराम यंत्र' स्थपित केलं.

राष्ट्रपतींनी हे यंत्र मंदिराच्या दुसऱ्या मजल्यावरच्या गर्भगृहात विधिवत पूजा अर्चनेनंतर आणि मंत्रोच्चारांसह स्थापित केलं. यावेळी उत्तर प्रदेशाच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल तसंच मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ उपस्थित होते. स्वामी विजयेंद्र सरस्वती यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेलं हे यंत्र वैदिक गणितावर आधारित असून सकारात्मक आध्यत्मिक ऊर्जा निर्मितीसाठी त्याची रचना करण्यात आली आहे.

---------------------------------------------------------

**राजनाथ सिंह**

सुक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग हे देशाच्या संरक्षण उत्पादन क्षेत्राचे महत्वाचे आधारस्तंभ म्हणून उदयाला येत आहेत असं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज केलं. नवी दिल्लीत राष्ट्रीय संरक्षण उद्य़ोग परिषदेत ते बोलत होते. भारताची तंत्रज्ञान क्षमता वाढवण्याच्या दृष्टीने स्टार्टअप, नवोद्योजक आणि संशोधक महत्वाची भूमिका बजावत असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

***(होल्ड बाईट राजनाथ सिंह)***

डिफेन्स एक्सलन्स मंच या पोर्टलमुळे अनेक संशोधक आणि नवोद्योजकांना संरक्षण क्षेत्रामध्ये थेट योगदान देण्याची संधी मिळाली असं त्यांनी नमूद केलं. संरक्षण उद्योगाचा अवजड मुख्य भाग तसंच सर्वसमावेशकता साधणे याबाबत सरकार वचनबद्ध आहे तर सुक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग, स्टार्टअप आणि युवा उद्योजक हे भारताच्या संरक्षण क्षमतेच्या भविष्याला आकार देण्याच्या बाबतीत महत्वाची भूमिका बजावू शकतील असही सिंग यांनी अधोरेखीत केलं.

---------------------------------------------------------

**पश्चिम आशिया**

पश्चिम आशियात सुरू असलेल्या संघर्षाबद्दल सरकार सजग असून भारतीय निर्यातदारांना दिलासा देण्यासाठी योग्य पावलं उचलत आहे, असं प्रतिपादन परकीय व्यापार महासंचालक लव अग्रवाल यांनी आज केलं. नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेला ते संबोधित करत होते. पश्चिम आशियातल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सरकारनं निर्यातदारांसाठी दिशानिर्देश जारी केल्याची माहितीही त्यांनी दिली.पश्चिम आशियामध्ये एअर इंडिया आणि एअर इंडिया एक्स्प्रेस या विमानकंपन्यांच्या एकूण अठ्ठेचाळीस विमानउड्डाणे आजपासून सुरु होतील. या दोन्ही कंपन्यांची जेद्दा आणि मस्कतमध्ये नियमित विमानसेवा सुरु राहिल. एअर इंडियाची विमाने दिल्ली आणि मुंबई पासून तर एअर इंडिया एक्स्प्रेसची विमाने बंगळुरू, हैदराबाद आणि कोझिकोळ्ळ इथून निघतील.

---------------------------------------------------------

**आत्मसमर्पण**

गडचिरोली इथं  एकूण ६८ लाख रुपयांचे बक्षीस असलेल्या ११ नक्षल्यांनी आज संध्याकाळी पोलिसांपुढे आत्मसमर्पण केलं. याप्रसंगी नक्षलविरोधी अभियानाचे पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील, उपमहानिरीक्षक अंकित गोयल, पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते अशी माहिती नुकतीच आमच्या प्रतिनिधी ने कळवली आहे.

------------------------------------------------------------

**तरुण भारत शताब्दी**

मराठी दैनिक 'तरुण भारत'च्या शताब्दीपूर्ती सोहळा नागपुरात संपन्न  झाला. या कार्यक्रमाला सरसंघचालक डॉ. मोहन भागवत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची प्रमुख उपस्थिती होती.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'तरुण भारत' हे आपण वाचलेले पहिले वृत्तपत्र असल्याचे सांगत, वैचारिक अधिष्ठानामुळेच या दैनिकाने शंभर वर्षांचा टप्पा गाठल्याचे नमूद केले. समाजात विचारांचे जतन व प्रसार करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या दैनिकाने सातत्याने केले असल्याचे त्यांनी सांगितले.सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी संघाच्या वाढत्या कार्यासाठी विकेंद्रीकरणाची गरज अधोरेखित करत, लहान घटकांद्वारे कार्य अधिक प्रभावीपणे पार पाडले जाईल असे सांगितले. तसेच, नव्या पिढीला आकर्षित करण्यासाठी सामाजिक माध्यमांवरील सक्रियता वाढविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी 'तरुण भारत'च्या समाजाभिमुख पत्रकारितेचे कौतुक केले

***(होल्ड बाईट केंद्रीय मंत्री नितीन गडकरी)***

------------------------------------------------------------

**टोल संकलन**

टोल संकलनात पारदर्शकता आणि सुगमता रहावी याकरता केंद्रसरकारने राष्ट्रीय महामार्ग नियमांच्या सुधारणेची अधिसूचना जारी केली आहे. यामुळे गुंतवणूकदारांचा विश्वास  तसंच कायदेशीर आर्थिक संरक्षण वाढेल असं या नियमात म्हटलं आहे. टोल चुकवणाऱ्यांकडून वसुली, ई नोटीस  एसएमएसद्वारे पाठवण्याची  सुविधा,याबरोबरच टोल दात्यांच्या तक्रारींचं निवारण करण्यासाठी वेगळं पोर्टल इत्यादी नवीन बाबींचा समावेश या नियमांमधे केला आहे.

------------------------------------------------------------

**गोलमेज परिषद**

विकसित भारताच्या संकल्पनेत नागपूर शहर 'रोल मॉडेल' ठरू शकते, असा सूर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात आयोजित ICTRD -आयसीटीआरडी

गोलमेज परिषदेत उमटला. या परिषदेत महापौर   नीता ठाकरे यांनी मनपा शाश्वत शहर विकासाच्या दिशेने कार्यरत असल्याचे सांगितले. नदी पुनर्जीवन, सोलर योजना, जलपुनर्भरण व हरित शहर उपक्रम राबविण्यावर भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केलं. माजी खासदार डॉ. विकास महात्मे यांनी "विकसित भारतीयातून विकसित भारत" साकार होईल असे मत व्यक्त करत कौशल्य व स्टार्टअप्सवर भर दिला. तज्ज्ञांनी नागपूरला लॉजिस्टिक, मेडिकल, शिक्षण व तंत्रज्ञान हब म्हणून विकसित करण्यावर भर दिला. युवकांचे कौशल्यविकास, स्टार्टअप्ससाठी निधी व शाश्वत विकासाच्या उपक्रमांमुळे नागपूर जागतिक ज्ञानकेंद्र बनू शकते, असेही मत व्यक्त करण्यात आले.

----------------------------------------------------------

**हवामान**

विदर्भाच्या बहुतांश जिल्ह्यांमध्ये आज वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.  या जिल्ह्यांमध्ये नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ, वर्धा आणि अमरावती या जिल्ह्यांचा समावेश आहे. अकोला, बुलढाणा आणि वाशिम या जिल्ह्यांमध्ये हवामान सामान्य  आहे. दरम्यान येत्या काही तासात अकोला, अमरावती, वाशिम आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यांसह, विजा आणि वादळ येण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे. दरम्यान आज बुलढाणा जिल्ह्यामध्ये चिरवली इथं  गारपीट झाल्याचं  आमच्या प्रतिनिधींनं  कळवलं  आहे.

----------------------------------------------------------

**मका पीक**

हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार भंडारा जिल्ह्यात काल वादळी वाऱ्याने हजेरी लावली आणि  जिल्ह्यातील काही भागात पाऊस पडला, यामुळे जिल्ह्यात  मका पिकाचे प्रचंड नुकसान झालं आहे.

----------------------------------------------------------